

पोलीस अधीक्षक कार्यालय, धाराशिव
जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ,संभाजी नगर-सोलापुर रोड, धाराशिव -413501
दुरध्वनी क्रमांक :- 02472-222717, फॅक्स क्र. 02472-227626
Email ID : sp.osmanabad@mahapolice.gov.in

जा.क्र.प्रलि-आस्था/भरती साहित्य खरेदी नोटीस/2026/1099 धाराशिव, दि.02/02/2026

::नोटीस::

विषय :- पोलीस भरतीसाठी साहित्य भाडे तत्वावर घेण्याकरीता दरपत्रक मागविण्याबाबत.

---00---

सर्व पुरवठाधारक यांना सुचित करण्यात येते की, पोलीस अधीक्षक कार्यालय धाराशिव आस्थापनेवर पोलीस शिपाई (123) व चालक पोलीस शिपाई (25) पदाची भरती आयोजित करण्यात आली असून त्याकरीता एकूण 15202 उमेदवारांनी आवेदन अर्ज सादर केले आहेत. सदर भरती करीता खालील नमूद कामाचे दरपत्रके खालील अटी पूर्ण करत असलेल्या पुरवठा धारकांकडून बंद पाकीटामध्ये दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सदरचे दरपत्रके हे दि.04/02/2026 रोजी सकाळी 11:00 वाजेपर्यंत या कार्यालयाच्या आवक शाखेत सादर करण्यात यावे.

1. आर.एफ.आय.डी. तंत्रज्ञान
2. बायोमॅट्रीक
3. सीसीटीव्ही कॅमेरे
4. डाटा इंण्ट्री सॉफ्टवेअर

अटी व शर्ती:-

1. पुरवठाधारक यांनी परवाना सादर करणे आवश्यक आहे.
2. पुरवठाधारक यांनी त्यांच्या पॅनकार्डची स्वयंसाक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे.
3. पुरवठाधारक यांनी त्यांचे GST प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे.
4. या कार्यालयाने पुरवठा आदेश दिल्यानंतर ठरवून दिलेल्या वेळेत उक्त नमूद तंत्रज्ञान पुरवठा न केल्यास किंवा सदरचे तंत्रज्ञान हे निकृष्ठ दर्जाचे प्राप्त झाल्यास सदर पुरवठा आदेश रद्द करण्याचे व देयक थांबवून ठेवण्याचे अधिकार हे मा.पोलीस अधीक्षक यांना राहिल याची दक्षता घ्यावी.
5. पुरवठाधारक यांना कोणत्याही शासकीय/ निमशासकीय कार्यालयाने Black List केले नसल्याचे शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.
6. आपण नोंदविलेली दर हे बाजारभावाशी सुसंगत असावे. भविष्यात आपण नोंदविलेल्या दराबाबत कोणताही प्रश्न उदभवल्यास त्याची सर्वस्व जबाबदारी ही आपली राहिल याची दक्षता घ्यावी.

रितु खोखर (भा.पो.से.)
पोलीस अधीक्षक, धाराशिव